तरुण भारत

# सदाफुली

https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com

बुधवार, १७ डिसेंबर २०२५

आतील पानावर

पान २– आमिरच्या नव्या सिनेमात दिसणार 'ही' ...
पान ३ – 'न्यूयॉर्क टाईम्स'च्या यादीत किंग खान
पान ४ – रश्मिकाने सांगितले आनंदी जगण्याचे गणित
पान ५ –सायली संजीव करणार राजकारणात एन्ट्री?
पान ६ – 'महावतार'मध्ये दिसणार दीपिका?



# रिंकूची 'आशा' प्रेक्षकांच्या भेटीला

अभिनेत्री रिंकू राजगुरूच्या आगामी चित्रपटाबद्दल मोठी अपडेट समोर आली आहे. 'बाई अडलीये म्हणूनच ती नडलीये' अशा प्रभावी टॅगलाईनसह येणाऱ्या 'आशा' या चित्रपटाचा टीझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. चित्रपट प्रदर्शनाची तारीखही जाहीर करण्यात आली आहे. येत्या १९ डिसेंबरला 'आशा' प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. प्रदर्शनाआधीच या चित्रपटाने आपली ताकद सिद्ध केली आहे. ६१ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळ्यात तब्बल चार पुरस्कार मिळवत 'आशा'ने समीक्षकांची दाद मिळवली आहे. त्यामुळे प्रेक्षकांमध्ये या चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखीनच वाढली आहे. 'आशा'मध्ये महिलांची झगडणारी दुनिया, त्यांचा आत्मविश्वास आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी अतिशय भावस्पर्शी पद्धतीने मांडली आहे. या कथानकाच्या केंद्रस्थानी आहे आशा सेविका आणि ही भूमिका साकारत आहे रिंकू राजगुरू. या व्यक्तिरिक्त या चित्रपटात सायंकित कामत, उषा नाईक, शुभांगी भुजबळ, सुहास शिरसाट, दिशा दानडे, दिलीप घारे आणि हर्षा गुप्ते यांसारखे कलाकार महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये झळकणार आहेत. रिंकूने साकारलेली 'आशा' ही फक्त आरोग्य यंत्रणेतील एक कर्मचारी नसून प्रत्येक महिला, प्रत्येक कुटुंबासाठी मार्गदर्शक, आधार आणि निर्भय आवाज आहे. तिच्या डोळ्यांतून दिसणारा संघर्ष, तिच्या पावलांतून जाणवणारी जबाबदारी आणि संकटांचा सामना करताना न हरता उभी राहणारी ताकद आहे. या सर्वांमुळे ही भूमिका चित्रपटाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. दिग्दर्शक दिपक पाटील म्हणाले, 'आशा' हा चित्रपट फक्त आशा आरोग्य सेविकांचा नाहीये तर घर सांभाळून, घरासाठी घराबाहेर पडणार्या प्रत्येक बाईचा आहे. तिच्या स्वप्नांचा, तिच्या जिद्दीचा आहे. सतत नवनवीन विषयांना उचलून धरणाऱ्या मराठी प्रेक्षकांना ही वेगळ्या वाटेवरची वेगळी आणि अनोखी गोष्ट निश्चितच आवडेल, अशी खात्री आहे. दिपक पाटील दिग्दर्शित 'आशा'चे कुमार मंगत पाठक, अभिषेक पाठक, निलेश कुवर, दैवता पाटील आणि दिपक पाटील निर्माते आहेत. तर मुरलीधर चटवानी आणि रवींद्र अवटी सहनिर्माते आहेत. हा चित्रपट एका महिन्यानंतर म्हणजेच १९ डिसेंबरला रिलीज होणार आहे.




# आमिरच्या नव्या सिनेमात दिसणार 'ही' मराठी अभिनेत्री

आमिर खानचा नवीन धमाकेदार गुप्तहेर चित्रपट 'हॅपी पटेल'ची घोषणा अखेर करण्यात आली आहे. हा चित्रपटाचं दिग्दर्शन वीर दासने केलं असून त्याचा दिग्दर्शक म्हणून हा पहिलाच चित्रपट आहे. या चित्रपटात वीर दास आणि मोना सिंग लीड रोलमध्ये दिसणार आहेत. या चित्रपटाचं शीर्षक जितकं मजेदार आहे, तसंच मेकर्सनी रिलीज केलेला अनाउन्समेंट व्हिडिओही सर्वांना हसवणारा आहे. विशेष म्हणजे चित्रपटात मराठी अभिनेत्री प्रमुख भूमिकेत आहे. 'हॅपी पटेल' चित्रपटाची खासियत म्हणजे, आमिर खान प्रोडक्शन्स नेहमीच हटके आणि अनोख्या कथा अत्यंत सादर करत आलं आहे. या चित्रपटात मराठी अभिनेत्री मिथिला पालकर खास भूमिकेत झळकणार आहे. मिथिलाला अनेक दिवसांनी मोठ्या बॉलिवूड प्रोजेक्टमध्ये पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. आमिर खानने त्याच्या प्रॉडक्शन हाऊस अंतर्गत 'लगान', 'तारे जमीन पर', 'दंगल' आणि 'सीक्रेट सुपरस्टार' सारख्या अविस्मरणीय चित्रपटांनंतर, ही फिल्मही वेगळ्या सिनेमाचा अनुभव देण्याचा आणखी एक प्रयत्न आहे. यावेळी आमिर खान प्रसिद्ध स्टँड-अप कॉमेडियन वीर दाससोबत काम करत आहेत. वीर दासने जगभरात प्रसिद्धी मिळवली आहे. याशिवाय 'गो गोवा गॉन', 'बदमाश कंपनी' आणि 'दिल्ली बेली' सारख्या चित्रपटांमध्येही काम केलं आहे. 'हॅपी पटेल' हा वीर दासचा 'दिल्ली बेली'नंतर आमिर खान प्रोडक्शन्ससोबतचा दुसरा चित्रपट आहे. 'हॅपी पटेल'ची घोषणा अगदी हटके आणि मजेशीर पद्धतीने करण्यात आली आहे. व्हिडिओमध्ये आमिर खान, वीर दासला विचारताना दिसतो की, तो आपल्या फिल्ममध्ये ॲक्शन, रोमांस आणि अगदी आयटम नंबर कशा अंदाजात दाखवणार आहे. आमिरला सतत आगामी चित्रपटाची चिंता दिसते की, प्रेक्षक याला कसा प्रतिसाद देतील. तर दुसर्या बाजूला थिएटरबाहेर पडलेले लोक चित्रपटाची प्रशंसा करताना दिसतात. आमिर खान-वीर दासचा हा मजेशीर व्हिडीओ चांगलाच व्हायरल झाला आहे. आमिर खान प्रोडक्शन्सच्या बॅनरखाली तयार होत असलेला 'हॅपी पटेल'चा दिग्दर्शक वीर दास असून हा चित्रपट १६ जानेवारी २०२६ रोजी थिएटरमध्ये रिलीज होणार आहे.



# मला कधीही गोलमेज मुलाखतीत बोलावले नाही



अनुपम खेर हे इंडस्ट्रीतील सर्वात दिग्गज अभिनेत्यांपैकी एक मानले जातात. त्यांनी चार दशकांहून अधिक काळाच्या कारकिर्दीत अनेक संस्मरणीय चित्रपट आणि भूमिका साकारल्या आहेत. तथापि, अभिनेत्याचे म्हणणे आहे की इंडस्ट्रीमध्ये त्यांची विस्तृत कारकीर्द असूनही, त्यांना वर्षअखेरीस होणाऱ्या गोलमेज मुलाखतींसाठी कधीही आमंत्रित केले गेले नाही. एका संभाषणादरम्यान, अनुपम खेर यांनी गोलमेज मुलाखतींबद्दलच्या त्यांच्या चिंता व्यक्त केल्या. अभिनेते म्हणाले, काही लोकांना असे वाटत नाही की मी आमंत्रित होण्यास पात्र आहे. जेव्हा अभिनयाचा विचार येतो तेव्हा मी त्यांचा वडील आहे. मी एक अभिनय शाळा चालवतो. मी एकदा एका वरिष्ठ संपादकाला फोन करून विचारले होते, 'तुम्हाला या सामान्य कलाकारांशी बोलण्यात इतके आनंद का होतो?' पण तुम्ही मला कधीच आमंत्रित केले नाही. अनुपम खेर या वर्षी अनेक चित्रपटांमध्ये दिसले आहेत. त्यांनी २०२५ ची सुरुवात कंगना राणौतसोबत इमर्जन्सी ने केली. त्यानंतर ते तुमको मेरी कसम, मेट्रो इन डिनो आणि तन्वी द ग्रेट सारख्या चित्रपटांमध्ये दिसले आहेत. त्यांनी तन्वी द ग्रेट चे दिग्दर्शन आणि निर्मिती देखील केली. भविष्यात त्यांचे अनेक चित्रपट पाइपलाइनमध्ये आहेत. अनुपम खेर दिग्दर्शित आणि अभिनीत, तन्वी द ग्रेट हा चित्रपट गोव्यात झालेल्या ५६ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (खऋऋख) दाखवण्यात आला. हा चित्रपट भारतीय सैन्य आणि ऑटिझमभोवती फिरतो. ही कथा तन्वी (शुभांगी दत्त) नावाच्या एका तरुणीभोवती फिरते, जी तिच्या आई (पल्लवी जोशी) आणि तिच्या आजोबा (अनुपम खेर) यांच्यासोबत राहते. तिच्या दिवंगत वडिलांपासून प्रेरित होऊन, तन्वी सशस्त्र दलात सामील होण्याचा संकल्प करते. या चित्रपटात बोमन इराणी, जॅकी श्रॉफ, करण टॅकर, अरविंद स्वामी, नासेर आणि ब्रिटिश अभिनेता इयान ग्लेन यांच्याही भूमिका आहेत.

# स्पिरीट चित्रपटात हुमा कुरेशीची एन्ट्री!

'दाक्षिणात्य अभिनेता प्रभास एका भव्य पुनरागमनाची तयारी करत आहे. त्याचे आगामी सर्वेच चित्रपट खूप चर्चेत आहेत. पण गेल्या काही दिवसांपासून द राजा साब चित्रपटाच्या सतत लांबणीवर पडणारी रिलीज डेट यामुळे सर्वत्र हा चित्रपट चर्चेचा विषय बनला आहे. अखेर आता नवीन वर्षात ९ जानेवारी २०२६ रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. याशिवाय प्रभास संदीप रेड्डी वांगा दिग्दर्शित करत असलेल्या स्पिरीट आणि फौजी या दोन चित्रपटांमुळे चर्चेत आहे. या दोन्ही चित्रपटांमध्ये फर्स्ट लूक समोर आला आहे.

एका वृत्तानुसार, संदीप रेड्डी वांगा यांच्या स्पिरीटमध्ये एक खास गाणं असणार आहे. या गाण्यासाठी अभिनेत्री हुमा कुरेशीची निवड करण्यात आली आहे. ती स्पिरीटमध्ये एक खास नृत्य करताना दिसणार आहे. या वर्षी अभिनेता राजकुमार रावचा मालिक हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात दिल थाम के या गाण्यावर हुमा कुरेशीने एक डान्स नंबर केला होता. या गाण्याची बरीच चर्चा झाली. प्रेक्षकांनी हुमाच्या डान्स नंबरला पसंती दिली. त्यामुळे तिला पुन्हा एकदा डान्स नंबर सादर करण्याची संधी स्पिरीट चित्रपटाने उपलब्ध करून दिली आहे.

प्रभासने आता संदीप रेड्डी वांगाच्या स्पिरीट चित्रपटावर काम सुरू केले असून, चित्रपटात अभिनेत्री तृप्ती डिमरी हिच्यासह अनेक बॉलिवूड कलाकारही असणार आहेत. प्रभाससोबत स्पिरीट बनवण्यापूर्वी संदीप रेड्डी वांगाने ॲनिमलचे दिग्दर्शन केले होते. रणबीर कपूर अभिनीत या चित्रपटाने ९१५ कोटींचे बॉक्स ऑफिस कलेक्शन केले होते.




# ‘न्यूयॉर्क टाईम्स’च्या यादीत किंग खान



बॉलीवूड अभिनेता शाहरुख खान हा त्याच्या अभिनयाना प्रमाणेच त्याच्या स्टायलिश अंदाजासाठीही ओळखला जातो. त्याचे विविध लूक्समधील फोटो-व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असतात. शाहरुखच्या या स्टायलिश अंदाजामुळे त्याचं ‘न्यूयॉर्क टाइम्स’च्या Mort Sylirh Peole 2025 यादीत नाव आलं आहे. विशेष म्हणजे या यादीत स्थान मिळवणारा तो एकमेव भारतीय आहे. शाहरुखच्या एखाद्या चाहत्याला तुम्ही भेटलात, तर ते नेहमी म्हणतात, शाहरुख खान फक्त व्यक्ती नाही, तर एक भावना आहे. जगातील अनेक देशांमध्ये भारताचं नाव घेतलं की, लोकांना सर्वांत आधी शाहरुख खानच आठवतो. म्हणूनच २०२५ च्या ‘न्यूयॉर्क टाइम्स’च्या यादीत शाहरुख खानचा समावेश होणं ही त्याच्या असंख्य चाहत्यांसाठी आनंदाची बातमी आहे. ‘न्यूयॉर्क टाइम्स’ने मे २०२५ मधील शाहरुखचा चर्शी ऋरश्रर मधील फोटो शेअर करीत लिहिलं, जगभरातील लाखो चाहत्यांकडून SRK म्हणून ओळखला जाणारा हा बॉलीवूडचा सुपरस्टार पहिल्यांदाच चर्शी ऋरश्रर मध्ये सहभागी झाला. शाहरुखनं टॅस्मेनियन सुपरफाईन वूलपासून तयार केलेला लांब कोट परिधान केला होता. या कोटावर जपानी हॉर्न बटन्स, सिंगल-ब्रेस्टेड डिझाईन, पीक कॉलर व रुंद लॅपल्स होते. त्यासह त्यानं क्रेप द शीन सिल्क शर्ट, टेलर्ड वूल ट्राउझर्स परिधान केलं होतं. या लूकवर त्यानं टूरमलिन, सॅफायर व डायमंडने सजवलेली ‘बेंगॉल टायगर हेड’ काठीही घेतली होती. डठघ चा लूक डिझाईन करताना काय प्रेरणा होती याबद्दल सब्यसाची म्हणालेले, शाहरुख हा महान सुपरस्टार्सपैकी एक आहे. त्यानं त्याच्या अभिनयानं जागतिक पातळीवर चाहतावर्ग निर्माण केला आहे. त्यामुळे ‘ब्लॅक डॅन्डी’ या माझ्या संकल्पनेतून मी त्याचं सुपरस्टारडम जागतिक मंचावर दाखवायचं ठरवलं. या खास लूकमधील फोटोंमध्ये शाहरुख रॉयल दिसत असला तरी त्यानं सांगितलं, मी कधीच इतका घाबरलो नव्हतो आता इथून पळून जावं असं का वाटतंय! कळत नाही, तरीही त्यानं धाडस करून हा कार्यक्रम गाजवला.

# मी शाहरुख खान बनू शकलो नाही, पण...



दृश्यम २’, ‘छावा’ आणि आता ‘धुरंधर’ अक्षय खन्नाने या वर्षात जोरदार कमबॅक केलं आहे. ‘छावा’मध्ये साकारलेल्या औरंगजेबाच्या भूमिकेनंतर आता त्याची ‘धुरंधर’ मधील रहमान डकैतची भूमिका व्हायरल होत आहे. ज्याप्रकारे अक्षय खन्नाने ही भूमिका साकारली आहे. ते पाहून चाहते थक्क झाले आहेत आणि त्याचं सर्वत्र कौतुक होत आहे. हिरोच्या भूमिका साकारून जेवढं प्रेम आणि प्रसिद्धी अक्षय खन्नाला मिळाली नाही. तेवढी त्याला या निगेटिव्ह म्हणजेच खलनायकाच्या भूमिकेने मिळवून दिली आहे. खरं तर अक्षय खन्ना हा स्टारकिड... सुपरस्टार विनोद खन्ना यांचा मुलगा असलेल्या अक्षयने ‘हिमालय पुत्र’ या सिनेमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं होतं. त्यानंतर ‘बॉर्डर’, ‘हंगामा’, ‘दिल चाहता है’, ‘हलचल’, ‘हमराझ’, ‘दिवानगी’, ‘रेस’ अशा सिनेमांमध्ये तो महत्वाच्या भूमिकांमध्ये दिसला. त्याचे सिनेमे तर हिट झाले पण मुख्य भूमिका साकारूनही अक्षयला हवं तसं स्टारडम मिळालं नाही. बॉलिवूड स्टार होऊ न शकल्याबाबत अक्षयने एका मुलाखतीत स्पष्ट शब्दांत उत्तर दिलं होतं. स्टारडम मोठ्या पडद्यावर केलेल्या कामामुळे मिळत नाही. किंवा तुम्ही किती श्रीमंत आहात, यानेही मिळत नाही. रतन टाटा किंवा धीरुभाई अंबानी यांच्यासारखं स्थान मिळवलं नाही म्हणून तुम्ही ५०० कोटींच्या कंपनीच्या बिजनेसला अपयशी म्हणू शकत नाही. त्याचप्रमाणे मी शाहरुख खान बनू शकलो नाही. याचा अर्थ असा होत नाही की मी यश पाहिलचं नाही. माझ्यासाठी माझं यश या तुलनेपेक्षा खूप मोठं आहे, असं अक्षय म्हणाला होता.



कलाकारांच्या आयुष्यात काय घडतंय, ते काय करत आहेत याबद्दल जाणून घेण्याची त्यांच्या चाहत्यांना नेहमीच उत्सुकता असते आणि जेव्हा कलाकाराच्या खासगी आयुष्यात काय घडतंय याबद्दल त्यांना कळतं तेव्हा काहीवेळा कौतुक करतात तर काहीवेळेला टीकाही करत असतात. असंच काहीचं घडलं सोनाक्षी सिन्हाबरोबर. सोनाक्षी बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिने अनेक चित्रपटांमध्ये विविध भूमिका साकारल्या आहेत. सोनाक्षीने तिचा प्रियकर झहीर इक्बालबरोबर २०२४ मध्ये लग्नगाठ बांधली. दोघाचं आंतरधर्मीय लग्न असून, लग्नापूर्वी दोघे सात वर्षं एकमेकांना डेट करीत होते. दोघे सात वर्ष एकमेकांपासून रिलेशनशिपमध्ये होते. पण, सोनाक्षीनं तीन वर्षं तिच्या रिलेशशिपबद्दल तिच्या घरच्यांना सांगितलं नव्हतं. तिनं तीन वर्षं तिची रिलेशनशिप तिच्या आई-वडिलांपासून लपवून ठेवल्याचं म्हटलं आहे. सोनाक्षीनं नुकतीच सोहा अली खानला मुलाखत दिली. त्यामध्ये तिनं तिच्या आंतरधर्मीय लग्नाबद्दल सांगितलं आहे. यावेळी तिनं तिचं आंतरधर्मीय लग्न असल्यानं अनेकांनी खूप चर्चा केली. लोकांनी टीका केली, असं म्हटलं आहे. सोनाक्षीला मुलाखतीदरम्यान याबद्दल विचारल्यानंतर ती म्हणाली, एक कारण तर काम होतं. जेव्हा तुम्ही एक महिला कलाकार असता तेव्हा अनेकदा तुमच्या रिलेशनशिपबद्दल बोललं जातं आणि तुम्ही कोणाला डेट करीत आहात याबद्दलही बोललं जातं. मला लोकांनी माझ्या कामाबद्दल बोलावं, असं वाटत होतं. सोनाक्षी पुढे म्हणाली, मी

# सोनाक्षीने तीन वर्ष लपवलं होते रिलेशनशिप

खूप मेहनत करते आणि मला माझ्या रिलेशनशिपबद्दल सांगून ते कष्ट वाया घालवायचे नव्हते आणि दुसरं कारण म्हणजे मी माझ्या आई-वडिलांना सांगितलं नव्हतं. पण, मला माहीत नाही की, लोकांना इतकी चर्चा का करावीशी वाटली आणि सगळ्यांना त्यांची मतं का मांडायची होती. खर सांगायचं तर आंतरधर्मीय लग्न करणारी मी पहिली मुलगी नव्हते आणि त्यानंतर मी शेवटची मुलगी नसणार आहे. मी एक स्त्री म्हणून माझे निर्णय घेत होते आणि ज्या लोकांना मी ओळखतही नाही, ते याबद्दल त्यांचं मत का व्यक्त करीत होते मला कळलं नाही. दरम्यान, सोनाक्षी ‘जटाधरा’ चित्रपटातून झळकली. अभिनेत्री सोशल मीडियावर खूप सक्रीय असते आणि तिच्या दैनंदिन जीवनातील घडामोडींबद्दल ती सागंत असते. नुकतीच तिने तिच्या युट्यूब चॅनेलवरुन तिच्या मुंबईतील वांद्रे येथील आलिशा घराची सफर दाखवली.



# रश्मिकाने सांगितले आनंदी जगण्याचे गणित

संपूर्ण देशाला वेड लावणारी लोकप्रिय दाक्षिणात्य अभिनेत्री रश्मिका मंदाना नेहमीच चर्चेत असते. रश्मिकानं तिच्या अभिनय आणि सौंदर्याच्या जोरावर प्रेक्षकांची मनं जिंकणारी रश्मिका चाहत्यांच्या मनावर राज्य करते. तिच्या 'गीता गोविंदम' आणि 'डिअर कॉम्रेड', 'पुष्पा' आणि निमल' या चित्रपटांनी तिला दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीसोबतच संपूर्ण देशभरात लोकप्रियता मिळवून दिली.

अलिकडेच रश्मिकाचा 'द गर्लफ्रेंड' सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला. या चित्रपटातील रश्मिकाच्या अभिनयाचं भरभरून कौतुक होत आहे. अशातच रश्मिकाच्या एका पोस्टने सर्वांचं लक्ष वेधलंय. रश्मिकानं तिच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाऊंटवरून स्वतःचे फोटो शेअर करत एक पोस्ट शेअर करत सकारात्मक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये तिने आनंदी जीवन जगण्याचा सल्ला चाहत्यांना दिलाय. तिनं लिहिलं, जगभर फिरा... शोध घेत रहा... चुका करा... स्वतःला माफ करा... स्वतःवर प्रेम करा... खा... मनसोक्त हसा... आनंदात जगा... लोकांचा आदर करा... आयुष्याचा आदर करा... स्वतःचा आदर करा... इतरांशी दयाळू रहा... स्वतःशीही दयाळू रहा... स्वतःची निवड करा आणि मला आशा आहे की तुम्ही हे सगळं स्वतःसाठी निवडाल, असं म्हणत तिनं पोस्टचा शेवट केला. रश्मिकानं आशा व्यक्त केली की, प्रत्येक व्यक्तीने आनंदी आणि शांत जीवन जगण्यासाठी या गोष्टी स्वतःसाठी निवडाव्यात. तिच्या या पोस्टवर चाहत्यांनी भरभरुन कमेंट करत प्रेमाचा वर्षाव केलाय.

दरम्यान, रश्मिका तिच्या विजय देवरकोंडासोबतच्या नात्यामुळेही चर्चेत आहे. लवकरच दोघं लग्नगाठ बांधणार आहेत. त्यांनी साखरपुडा उरकल्याचंही बोललं जातं. रश्मिका आणि विजय यांचा लग्न समारंभ शाही थाटात आणि पारंपारिक विधींनी पार पडणार आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या पोस्टनुसार, त्यांचे भव्य लग्न २६ फेब्रुवारी २०२६ रोजी आहे. राजस्थानमधील उदयपूर येथील एका आलिशान राजवाड्यात हे लग्न होणार आहे.

# समंथा- राजच्या लग्नानंतर एक्स पत्नीने सोडले मौन

दिग्दर्शक राज निदिमोरूने नुकतेच अभिनेत्री समंथा रूथ प्रभूशी लग्न केले. या लग्नानंतर चार दिवसांनी राजची एक्स पत्नी श्यामली डेने आपले मौन सोडले आहे. श्यामलीने तिला साथ देणाऱ्या प्रत्येकाचे आभार मानले आहेत. तिने आणखी काय म्हटले आहे, हे जाणून घेऊया... श्यामली डेने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीजवर एक मोठी पोस्ट शेअर केली, ज्यात तिने तिचा एक्स पती राज आणि समांथाच्या लग्नानंतर मिळालेल्या पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तिने आपल्या नोटची सुरुवात करताना लिहिले, मी संपूर्ण रात्र जागून, कुस बदलत आणि विचारमंथन करत घालवली आणि मला जाणवले की, माझ्यासोबत जे काही चांगले घडत आहे, ते स्वीकारले नाही तर ते कृतघ्नता ठरेल. श्यामलीने लिहिले की, ती मेडिटेशनचा सराव करत आहे आणि त्याचा एक भाग म्हणून सर्व लोकांना 'शांती, प्रेम, क्षमा, आशा, प्रकाश, आनंद, प्रेमळ दया, सदिच्छा मिळावी आणि चांगले करण्याची इच्छा आहे. श्यामली डेच्या मते, आता तिला जो पाठिंबा मिळत आहे. तिने लिहिले की, जसे एका मित्राने मला आठवण करून दिली, मला आता जे मिळत आहे, ती फक्त त्या उर्जेची परतफेड आहे. तिच्याकडे कोणताही जनसंपर्क अधिकारी नाही, हे स्पष्ट करताना तिने खुलासा केला की, ती आता लग्नापेक्षा अधिक गंभीर गोष्टींशी झगडत आहेत. तिने पुढे लिहिले की, म्हणून एक विनंती आहे, कृपया ही जागा स्वच्छ ठेवा. शेवटी, तिने पुन्हा एकदा सर्वांचे आभार मानले आणि त्यांच्या उत्तम आरोग्य, सुख, समृद्धी आणि अध्यात्मिक प्रगतीची कामना केली. राज निदिमोरूने २०१५ साली श्यामलीशी लग्न केले होते आणि ते दोघे २०२२ मध्ये वेगळे झाले. २०२४ मध्ये राज 'द फॅमिली मॅन २' आणि 'सिटाडेल: हनी बनी' स्टार समांथाला डेट करत असल्याच्या चर्चा सुरू झाल्या. या जोडप्याने कोईम्बतूर 'भूत शुद्धि विवाह' समारंभात आपल्या नात्याला अधिकृत स्वरूप दिले.

# रजनीकांत यांच्या 'या' चित्रपटाला ऐश्वर्याने दिला होता नकार


रजनीकांत हे भारतीय चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते आहेत. त्यांनी प्रामुख्याने दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये काम केले आहे. तसेच काही हिंदी चित्रपटांमध्येदेखील काम केले आहे. आता रजनीकांत यांचा २५ वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेला एक तमिळ चित्रपट पुन्हा प्रदर्शित होत आहे. २५ वर्षांपूर्वी या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला होता. या सिनेमाने अनेक रेकॉर्ड तोडले आणि पुरस्कारही जिंकले. देशभरातील ८६ चित्रपटगृहांमध्ये हा सिनेमा १०० दिवस चालला. नंतर या चित्रपटाचा तेलुगूमध्ये 'नरसिंहा' या नावाने रिमेकही करण्यात आला. या चित्रपटाचे नाव पदयप्पा आहे. आता १२ डिसेंबरला हा चित्रपट पुन्हा प्रदर्शित झाला आहे. अलीकडेच, रजनीकांत यांनी पदयप्पा या सिक्वेलची घोषणा केली. ज्याचे नाव नीलंबरी: पदयप्पा २ हे असणार आहे. आता पदयप्पा सिनेमा पुन्हा प्रदर्शित होण्यापूर्वी, रजनीकांत यांनी एक व्हिडीओ शेअर करत चित्रपटाच्या संबंधित काही गोष्टी शेअर केल्या. रजनीकांत यांनी खुलासा केला की राम्या कृष्णन या चित्रपटासाठी पहिली पसंती नव्हती. तर ऐश्वर्या रायने या चित्रपटात काम करावे असे वाटत होते. रजनीकांत म्हणाले, आम्हाला ऐश्वर्या रायने ही भूमिका साकारावी अशी इच्छा होती. आम्ही तिच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. जर ऐश्वर्या ही भूमिका साकारण्यासाठी तयार झाली असती तर मीतीन वर्षे वाट पाहण्यास तयार होतो. कारण ती भूमिकाच तशीच होती. ती भूमिका यशस्वी होणे खूप महत्वाचे होते. रजनीकांत पुढे म्हणाले, आम्ही असे ऐकले होते की ऐश्वर्या रायला ही भूमिका साकारण्यामध्ये रस नव्हता. ऐश्वर्याच्या नकारानंतर, निर्मात्यांनी निलांबरीच्या भूमिकेसाठी श्रीदेवीपासून माधुरी दीक्षितपर्यंत अनेक प्रसिद्ध अभिनेत्रींशी संपर्क साधला. मात्र, ज्या अभिनेत्रीच्या डोळ्यात ती चमक असेल, अशा अभिनेत्रीच्या शोधात संपूर्ण टीम होती. याचदरम्यान दिग्दर्शक के.एस. रविकुमार यांनी रम्या कृष्णनचे नाव सुचवले. रजनीकांत यांनी असेही सांगितले केली की पदयप्पाचा दुसरा भाग 'नीलंबरी: पदयप्पा २' नावाचा सिक्वेल तयार होत आहे. 'पदयप्पा'बद्दल बोलायचे झाले जगभरात प्रदर्शित होणारा हा पहिला तमिळ चित्रपट होता.





# सायली संजीव करणार राजकारणात एन्ट्री?

मराठी सिनेसृष्टीतील अनेक कलाकारांनी राजकारणात एन्ट्री केली आहे. अनेक मराठी कलाकारही अभिनयासोबतच राजकीय क्षेत्रातही वेगवेगळ्या पक्षांसाठी काम करताना दिसतात. पक्षांच्या अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या त्यांच्यावर सोपविण्यात आल्या आहेत. अशातच मराठी सिनेसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्रीने एका मुलाखतीत दिलेल्या उत्तरामुळे अभिनेत्री राजकारणात एन्ट्री करणार असल्याची चर्चा रंगली आहे. मी अजून असं काही ठरवलेलं नाही. मला राजकीय विश्लेषक म्हणून काम करायला खूप आवडेल. मला एखाद्या पक्षात सक्रीय काम करत राहण्यापेक्षा मला संपूर्ण राजकारणाचं विश्लेषण करायला फार मजा येईल. असे स्पष्ट मत सायली संजीवने बोलताना व्यक्त केले. २००९ पासून मला राजकारणाची गोडी निर्माण झाली आहे. राज साहेबांनी मनसेची स्थापना केली त्यावेळी मी वाढत्या वयात होते. माझ्या वाढत्या वयात मी त्यांची भाषणे ऐकली. त्यामुळे माझ्यावर त्यांचा खूप जास्त प्रभाव पडला असल्याचे देखील अभिनेत्रीने सांगितले. खरंतर अभिनेत्री सायली संजीव ही मनसे प्रमुख राज ठाकरेंच्या भूमिकांशी सहमत असल्याचे तिने जाहीरपणे अगोदर दिलेल्या मुलाखतीमधून सांगितले आहे. त्यामुळे सायलीची राजकारणाबाबत असलेले मतं पाहता ती राजकीय क्षेत्रात पाऊल ठेवणार का? हे पाहणे महत्वाचे असणार आहे. या मुलाखतीत सायलीने मराठी भाषेवरही भाष्य केले. आपल्या भाषेचा, आपल्या संस्कृतीचा आपण मान ठेवला तर बाकीचे लोक मान ठेवतील, असे ती म्हणाली. मराठी सिनेसृष्टीतील आघाडीची प्रसिद्ध अभिनेत्री म्हणून सायली संजीवकडे पाहिले जाते. कैरी या चित्रपटामुळे ती सध्या चर्चेत असून, हा चित्रपट १२ डिसेंबर २०२५ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित झाला आहे.





# जयाजींना वाटतं की, मी त्यांना चित्रपटात घेतलं नाही

अमिताभ बच्चन यांनी बॉलीवूडमध्ये स्वत:ची अँग्री मॅन म्हणून ओळख निर्माण केली. 'शोले' ते 'सूर्यवंशम', 'पीकू', 'कल्की : २८९८ एडी' या चित्रपटांत त्यांनी काम केले आहे. आजपर्यंत अनेक कलाकारांनी त्यांच्याबरोबर काम केले आहे, तसेच त्यांच्याबरोबर काम करण्याचा अनुभवदेखील ते सांगताना दिसतात. लोकप्रिय अभिनेते व दिग्दर्शक महेश मांजरेकर यांनीदेखील अमिताभ बच्चन यांच्याबरोबर काम केले आहे. २००२ मध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटात अमिताभ बच्चन आणि महेश मांजरेकर अभिनय करताना दिसले होते. तसेच, २००५ ला 'विरुद्ध' चित्रपटात त्यांनी एकत्र काम केले होते. 'विरुद्ध' चित्रपटाचे दिग्दर्शन महेश मांजरेकर यांनी केले होते. या चित्रपटात अमिताभ प्रमुख भूमिकेत दिसले होते. मांजरेकर यांना एका मुलाखतीत विचारले गेले होते की, तुमचे जया बच्चन यांच्याबरोबर चांगले संबंध आहेत की अमिताभ यांच्याबरोबर? त्यावर महेश मांजरेकर म्हणाले, माझे आणि अमिताभ यांच्याशी चांगले संबंध आहेत. मला असं वाटतं की, तेव्हा माझा एक घोळच झाला. विरुद्ध हा एबी कॉर्पो. लि. या अमिताभ यांच्या कंपनीचा चित्रपट होता. आम्ही पार्टनर होतो; पण चित्रपट त्यांचा होता मी जेव्हा अमिताभ यांना गोष्ट ऐकवली, तेव्हा ते म्हणाले की, चांगली गोष्ट आहे. त्यांनी मला विचारले की, माझ्या पत्नीची भूमिका कोण साकारणार आहे? मी त्यांना सांगितले की, जयाजी करतील. ते म्हणाले की, कोणीतरी दुसरे पाहिजे. आता त्यांच्या डोक्यात काय असेल ते मला माहीत नाही; पण मला त्या भूमिकेत जयाजीच हव्या होत्या. पण, जयाजी यांना वाटलं की, मी त्यांना चित्रपटात घेतलं नाही. त्या प्रीमियरला म्हणाल्या की, जेव्हा यांचं नाटक कराल तेव्हा मला त्यामध्ये घ्या. पण, माझी त्या दोघांबरोबर काम करण्याची संधी गेली. याच मुलाखतीत ते रजनीकांतबरोबर काम करण्याच्या अनुभव सांगताना म्हणाले, तो माणूस प्रेमळ आहे. मांजरेकर यांच्या कामाबद्दल बोलायचे, तर ते काही दिवसांपूर्वी 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आले होते.

# त्यांच्यासाठी ते काम करणं हा गाढवपणा!



अभिनेता पुष्कर जोग हा त्याच्या वक्तव्यांमुळे, सोशल मीडियावरील पोस्टमुळे सातत्याने चर्चेत असतो. त्याच्या स्पष्ट वक्तव्यांची मोठी चर्चा होताना दिसते. आता अभिनेता पुन्हा एकदा त्याच्या सोशल मीडियावरील पोस्टमुळे चर्चेत आला आहे. पुष्कर जोगने इन्स्टाग्रामवर एक स्टोरी शेअर केली आहे. या स्टोरीमध्ये त्याने जोग बोलणार हा हॅशटॅग देऊन काही ओळी लिहिल्या आहेत. पुष्कर जोगने लिहिले, गोड गोड बोलून, काही लोक स्वत:चं काम काढून घेतात. हा कदाचित हलकटपणा असेल. पण, हे माहीत असूनही त्यांच्यासाठी ते काम करणं हा शुद्ध गाढवपणा आहे. पुढे त्याने लिहिले, काय करणार? स्वभावाला औषध नाही. चांगुलपणा नडतो; पण आता नाही, पुढे अभिनेत्याने जोग बोलणार, असे लिहिले आहे. आता पुष्करने अशी पोस्ट त्याने का शेअर केली आहे, नेमके काय घडले आहे, याबद्दल मात्र काही स्पष्टता नाही. पुष्कर सोशल मीडियावर सक्रिय असतो. तो सोशल मीडियावरून त्याच्या खासगी आयुष्यातील, तसेच व्यावसायिक आयुष्यातील अनेक गोष्टी शेअर करतो. अनेकदा त्याच्या वक्तव्यांमुळे त्याला ट्रोलिंगचादेखील सामना करावा लागतो. मात्र, पुष्कर त्याची मते खुलेपणाने व्यक्त करतो. अभिनेत्याने याआधी मराठी सिनेमांबद्दल केलेल्या वक्तव्यांची मोठी चर्चा झाली होती. मराठी चित्रपटसृष्टीतील कलाकारांनी, निर्मात्यांनी, दिग्दर्शकांनी एकत्र आले पाहिजे, एकीने काम केले पाहिजे, तरच मराठी सिनेमे यशस्वी होतील, अशा आशयाचे मत त्याने अनेकदा व्यक्त केले आहे. पुष्कर जोगने बालकलाकार म्हणूनही काम केले आहे. १९९५ ला प्रदर्शित झालेल्या 'हम दोनों' सिनेमात तो दिसला होता. त्यानंतर त्याने ऐसी भी क्या जल्दी है या १९९६ मध्ये प्रदर्शित झालेल्या सिनेमातही काम केले. २००७ ला प्रदर्शित झालेल्या जबरदस्त या मराठी चित्रपटातून त्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. पुष्कर त्याच्या डान्ससाठीदेखील ओळखला जातो. तो २०१८ ला बिग बॉसच्या पहिल्या पर्वातदेखील सहभागी झाला होता. या पर्वात तो विजयी झाला नाही; मात्र त्याने त्याच्या खेळाद्वारे चाहत्यांची मने जिंकली होती. पुष्कर फक्त अभिनयच नाही, तर चित्रपट निर्मिती आणि दिग्दर्शनाच्या माध्यमातूनही प्रेक्षकांच्या भेटीला येतो. काही चित्रपटांची त्याने निर्मिती केली आहे; तर काही चित्रपटांचे त्याने दिग्दर्शनही केले आहे. लवकरच तो ह्युमन कोकाईन या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.



# ‘महावतार’मध्ये दिसणार दीपिका?

बॉलिवूड अभिनेता विकी कौशलच्या ‘छावा’ या चित्रपटाला मोठी पसंती मिळाली. या चित्रपटाच्या यशानंतर आता विकी कौशल ‘महावतार’ चित्रपटात पाहायला मिळणार आहे. आता या चित्रपटात विकी सोबत मुख्यभूमिकेत कोणती अभिनेत्री झळकणार त्याबाबतची अपडेट समोर आली आहे. मीडिया रिपोर्टनुसार, दीपिका पादुकोण ‘महावतार’मध्ये मुख्य अभिनेत्री म्हणून दिसणार आहे. दीपिका आणि निर्मात्यामध्ये चर्चा सुरू असल्याचे बोले जात आहे. पहिल्यांदाच विकी कौशल आणि दीपिका पादुकोण स्क्रीन एकत्र शेअर करणार आहे. मात्र अद्याप याबाबत कोणतीही मात्र अधिकृत घोषणा करण्यात आलेले नाही. ‘महावतार’ चित्रपट पुढील वर्षी ख्रिसमसमध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. ‘महावतार’ चित्रपटाची निर्मिती दिनेश विजन आणि दिग्दर्शन अमर कौशिक करत आहेत.

‘महावतार’ हा पौराणिक ड्रामा आहे. जो भगवान परशुरामच्या कथेवर आधारित आहे. याशिवाय विकी कौशलचा लवकरच ‘लव्ह अँड वॉर’ मधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात विकी कौशलसोबत रणबीर कपूर आणि आलिया भट्ट देखील झळकणार आहे. तर दीपिकाला ‘कल्की’मधील एक्झिटनंतर आता हा नवा चित्रपट मिळणार असल्याच्या चर्चा

# आलियाच्या ‘अल्फा’साठी करावी लागणार प्रतिक्षा

बॉलीवुडमधील सर्वात चर्चित चित्रपटांपैकी एक असलेल्या ‘अल्फा’ची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. मात्र अभिनेत्री आलिया भट्ट आणि शर्वरी वाघ यांच्या जोडीच्या दमदार ॲक्शन चित्रपटाची रिलीज तारीख पुढे ढकलण्यात आली आहे. ‘अल्फा’ चित्रपट याआधी २५ डिसेंबर रोजी प्रदर्शित होणार होता. मात्र आता चित्रपटाची रिलीज डेट बदलण्यात आली आहे. हा भारतातील पहिला महिला-प्रधान ॲक्शन चित्रपट आहे. मात्र आता ‘अल्फा’ चित्रपट १७ एप्रिल २०२६ ला रिलीज होणार आहे. चित्रपटात उत्तम व्हीएफएक्स म्हणजे व्हिज्युअल इफेक्ट्स पाहायला मिळणार आहे. ज्यासाठी प्रेक्षक आतुरतेने चित्रपटाची वाट पाहत आहेत. या चित्रपटाची रिलीज तारीख बदलण्याचे मुख्य कारण त्याचे व्हिज्युअल इफेक्ट्स आहे. याबाबत चित्रपटाच्या प्रवक्तयानी सांगितले की, अल्फा हा आमच्यासाठी खास चित्रपट आहे. आम्ही तो सिनेमॅटिक स्वरूपात सादर करू इच्छितो. आम्हाला जाणवले की व्हीएफएक्सला अपेक्षेपेक्षा थोडा जास्त वेळ लागेल. अल्फा हा सर्वांना आवडेल असा थिएटर अनुभव बनवण्यात आम्ही कोणतीही कसर सोडू इच्छित नाही. म्हणूनच, आम्ही आता १७ एप्रिल रोजी हा चित्रपट प्रदर्शित करणार आहोत. चित्रपटात आलिया भट्ट आणि शर्वरी वाघ पहिल्यांदाच एकत्र दिसणार आहेत.





# आयुष्य भरभरुन जगता आले पाहिजे!

मलायका अरोरा ही बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. मात्र, तिचे आयटम साँग्स मोठ्या प्रमाणात गाजले. तिला या गाण्यांमधून मोठी ओळख मिळाली. ‘छैया छैया’, ‘मुन्नी बदनाम हुई’ अशा गाण्यांमधून तिला मोठी लोकप्रियता मिळाली. तिच्या अनोख्या डान्सच्या स्टाईलसाठी आणि ऊर्जेसाठी मलायका अरोरा ओळखली जाते. आता नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत मलायकाने, जेव्हा आयटम साँगमध्ये काम केले जाते तेव्हा तुमच्यावर अनेक मर्यादा येतात असे वक्तव्य केले आहे. मलायका अरोराने एका मुलाखतीत अभिनेत्री म्हणाली, मला जितकी संधी आयटम साँग करण्याची मिळाली, तितकी मला अभिनयासाठी ऑफर आली नाही. मला डान्स करणे खूप आवडते. परफॉर्मन्स करणे हे माझे आवडते काम आहे. याच मुलाखतीत अभिनेत्री असेही म्हणाली की, जेव्हा गाण्याला आयटम नंबर असे लेबल लावले जाते, तेव्हा त्याबरोबर मर्यादा येतात. पण, आज मी पाहते की अनेक कलाकार त्याकडे एक क्रिएटिव्ह चॅलेंज म्हणून पाहतात. डान्स संकल्पना, परफॉर्मन्स, गाणे एखाद्या चित्रपटाच्या कथेत कसे बरोबर फिट बसते, यावर लक्ष केंद्रित केले जाते. अशी गाणी बनवताना त्याकडे आदराने पाहिले जाते. मलायका असेही म्हणाली की, फक्त अभिनय किंवा डान्सच नाही तर मला दिग्दर्शन आणि निर्मिती क्षेत्रातदेखील काम करायला आवडेल. पडद्यामागची भूमिका साकारायला मला नक्कीच आवडेल. अभिनेत्री पुढे म्हणाली, काळाबरोबर पुढे गेले पाहिजे, पण या सगळ्यात स्वत:ला बदलू नये. तुम्हाला शिकत राहावे लागते, तंदुरुस्त राहावे लागते. तुम्हाला आयुष्य भरभरून जगता आले पाहिजे.मला कधीच कोणत्याही एका प्रतिमेमध्ये अडकायला आवडत नाही. मला आशा आहे की वारसा हा निर्भयतेचा असतो. लोक तुम्हाला जज करतात, तुमच्या मार्गातील अडथळे बनतात; परंतु या सगळ्याला न जुमानता आयुष्यात पुढे जाता आले पाहिजे. मलायका अरोरा आणि अरबाज खान यांचा २०१७ ला घटस्फोट झाला आहे. अरबाजपासून वेगळे झाल्यानंतर मलायकाला तिच्या आयुष्यात प्रेम असावे, तिचा जोडीदार असावा असे वाटते. ती अर्जुन कपूरबरोबर रिलेशनशिपमध्येदेखील होती. मात्र, यामुळे तिला अनेकदा ट्रोलिंगचा सामना करावा लागतो. यावर अभिनेत्री म्हणाली, मला माझ्या सत्यावर विश्वास ठेवायचा आहे. मला काय वाटते हे महत्त्वाचे आहे. नकारात्मक गोष्टींना मी माझी किंमत ठरवू देत नाही.

# भयावह स्मृती संसार: आल्फ्रेड हिचकॉक



**सर्वसाधारणपणे कुठलीही व्यक्ती मनातील भय कसे निघेल, याचा प्रयत्न करतो. भीतीपासून दूर पळतो. अगदी बालपणापासून मानवाला भीती ही शत्रूसमान वाटते. मोठे झाल्यावर भयाच्या प्रसंगाचे स्वरूप बदलते, पण भय कायम असते. प्रत्येक मनुष्याच्या जीवनात अनेक भयग्रस्त प्रसंग येतात व त्यातून कसे बाहेर पडलो, त्यावेळी काय मन:स्थिती झाली होती, याचे वर्णन प्रसंग टळल्यावर रंगवून सांगतात. प्रत्यक्षात भयापासून व भयग्रस्त ठिकाणापासून स्वत:ला दूर ठेवतात. आज मी तुम्हाला अशा व्यक्तीची जीवन कथा सांगणार आहे. जो भयाला गोंजारत होता. जिथे भयावह काही असेल तिथे जाण्यात व भयाचा सामना करण्यात त्याला अतोनात आनंद व्हायचा. अर्थात हे काही शौर्याचे लक्षण नाही. म्हटले तर विकृतीही नाही. नाईलाजाने आलेल्या अनुभवातून ही सवय लागू शकते. अशी व्यक्ती म्हणजे हॉलिवूडमधील चित्रपटातील जगप्रसिद्ध निर्माता, निर्देशक व कलाकार आल्फ्रेड हिचकॉक होय.**

मूकपटापासून बोलपटापर्यंत त्याने अनेक भयग्रस्त (हॉरर) चित्रपट काढलेत व संपूर्ण जगात हॉरर चित्रपटांचा तो बादशहा बनला. त्याचे नाव माहीत नसलेला मागील पिढीतील चित्रपट रसिक विरळाच! अर्थात कल्पना नसलेले भयावह वातावरण निर्माण करणारी ही व्यक्ती बालपणापासूनच तशी घडली होती. आपणास सुखकर, सुखरूप प्रसंगात आनंद मिळतो, तर आल्फ्रेड भीतिग्रस्त प्रसंगात रमायचा. नव्हे त्याला तशी सवयच अनुभवातून जडली होती. १३ ऑगस्ट १८९९ रोजी लंडन येथे रोमन कॅथोलिक परिवारात आल्फ्रेडचा जन्म झाला. त्याच्या आईवडिलांचे हे तिसरे अपत्य. 'जेसुईट' स्कूलमध्ये प्रवेश घेतल्यामुळे कर्मकांडी जेसुईटीबरोबर त्याला राहावे लागत असे. अतिशय सतर्क राहणे हे भयावर मात करण्यास उपयुक्त असते, हा धडा तो शिकला. पुढील आयुष्यात त्याला ही सवय उपयोगी पडली.

आल्फ्रेड ५ ते ६ वर्षांचा असताना त्याला घरात एकट्याला झोपवून त्याचे आई-वडील रात्रीच्या वेळी बाहेर कामाला गेले. त्यांना वाटले ते येईपर्यंत मुलगा झोपला राहील, परंतु ते बाहेर गेल्यावर थोड्या वेळात याला जाग आली. त्याच्या आजूबाजूला कोणी नव्हते, खोलीत काळोख होता. तो मोठ्याने ओरडून हाका मारू लागला, पण कुणाचाही प्रतिसाद मिळाला नाही. तो घाबरला व लट लट कापणार्या पायाने मनाचा हिय्या करून त्या खोलीतून स्वयंपाकघरात आला. तिथे अंधुक प्रकाशात टेबलावर ठेवलेले अन्न दिसले. तो त्या दिशेने चाचपडत त्या दिशेने जात असता, एका मोठ्या आवाजाने तो दोन पावले मागे सरला. त्याच्या काळजात धस्स झाले. पण तो सतर्क तेणे वेध घेत असताना त्याला कळले की, अंधारात त्याचाच हात टेबलावरील पाण्याच्या ग्लासाला लागला व तो खाली पडला, त्याचा हा आवाज होता. यानंतरच्या भयाचा कयास लागल्यामुळे आधीची भयग्रस्त स्थिती थोडी सहनीय झाली. एकावर एक संकटे आली असता, नवीन संकटावर मात केल्यास आधीच्या संकटाबद्दलची भीती थोडी कमी होऊन मन पक्के होते व कुठल्याही संकटाला सामना करण्यास सज्ज होते. हा अनुभव त्याने घेतला.

कदाचित भयाविषयीच्या तत्त्वज्ञानात हा उपाय लिहिला असेल. पण प्रत्यक्षात असे होते खरे! हे सर्व करीत असताना एकटेपणाच्या जाणिवेतून व अंधाराच्या साम्राज्यातून कुणी आजूबाजूला लपला तर नसेल, कुणी आपल्यावर हल्ला तर करणार नाही, असे भयावह विचार त्या बालसुलभ बुद्धीत येणे साहजिकच होते. हे त्याचे पहिले भय व भयाचा अनुभव, भीतीचे तत्त्वज्ञान, सतर्कता, जागरूकता इ. गोष्टीचे बाळकडू आल्फ्रेडला प्राप्त झाले. तो एक प्रकारे जणू भविष्यातील त्याच्या आगळ्या- वेगळ्या कारकीर्दीसाठी ट्रेनिंगच घेत होता. वय वाढले तसे भयप्रद विचार व अनुभव दिवसागणीक वाढतच गेले. त्याला भयावह प्रसंग आवडायला लागले. अनुभवातून आलेल्या भयाला मनात साठवून ठेवण्याचा प्रयत्न तो करायचा. तो मूकपटाच्या काळापासूनच चित्रपटात रमला. वयाच्या २५ व्या वर्षी, १९२४ साली तो चित्रपट निर्देशक बनला. सर्वप्रथम 'लाईफ बोट' हा मूकपट त्याने निर्देशित केला. त्यासाठी प्रत्यक्षात समुद्रात लाईफ बोट फिरवून आपल्या धारिष्ट्याचा दाखला दिला. त्याचे चित्रीकरण करून घेतले. यात काम करण्यासाठी त्याने स्वत:चे वजन ३०० पौंडावरून २०० पाऊंडावर आणले. अशाच प्रकारे सात चित्रपट धाडसी व भययुक्त प्रकारचे बनविले, तेही केवळ तीन वर्षात. नंतर बोलपटाचा जमाना सुरू झाला. त्याचा आवडता प्रकार पडद्यावर दाखविण्यास संवाद व संगीताची जोड मिळाली. त्याच्या पहिल्याच 'ब्लॅकमेल' या बोलपटात त्याने 'झपटन' नावाचे तंत्र वापरून व ब्रिटिश म्युझियमच्या पृष्ठभूमीचा उपयोग करून आपला कार्यभाग साधला.

१९४० साली 'फॉरेन करोसपोंडंट' त्याची पहिली हॉलिवूड फिल्म होती. नंतर 'सस्पेंशन', 'शॅडो ऑफ द डाऊट्स' इ. अनेक भव्य चित्रपट काढल्यावर, १९६० साली त्याने 'सायको' या चित्रपटात आपली अभिनव अभिरुची (भयग्रस्त अभिरुची) पणाला लावली. हा चित्रपट जगभर मान्यता प्राप्त झाला. नव्हे, हा चित्रपट आल्फ्रेड हिचकॉकची ओळख बनला. सस्पेन्स व हॉरर चित्रपट बनविण्यात त्याचा हात जगभरात आजतागायक कुणी धरू शकला नाही. त्याच्या जीवनातील अनुभव व त्याने भयाचे तत्त्वज्ञान आत्मसात करून आवडीने आपले जीवन तसेच घडू दिले. त्याच्या चित्रपटातील रहस्य शेवटीच समजायचे. म्हणूनच हिचकॉकच्या चित्रपटाची स्टोरी आधी कुणी जाणून घेत नसत.

१९६१ नंतर हिचकॉकच्या यशाला ओहोटी लागली. त्यानंतर त्याने फक्त ७ चित्रपट बनविले. १९७६ साली बनविलेला 'फॅमिली प्लॉट' हा अखेरचा चित्रपट होता. त्यात त्याने छोटीशी भूमिका करून व्याधी, वार्धक्य, चिंता यामुळे बेजार दिसणार्या चेहर्याचे दर्शन घडविले. पटकथेतील दृश्य फिल्मांकन करण्याचा नकाशा हिचकॉकच्या मेंदूत तयार असायचा.

२९ एप्रिल १९८० रोजी वयाच्या ८१ व्या वर्षी जगभरातील चित्रपट जगतात आपली स्वतंत्र ओळख ठेवून आपला भयावह स्मृती संसार बाजूला ठेवून परलोकातील रहस्ये उलगडण्याकरिता हा भय विषयाचा मनोवैज्ञानिक रवाना झाला.

**रमेश पोफळी**

# शिल्पा शेट्टीला करायचे होते अक्षय कुमारशी लग्न



१९९० च्या दशकात अक्षय कुमार आणि शिल्पा शेट्टी यांच्या प्रेमसंबंधांची खूप चर्चा झाली होती. पण काही वर्षांनी हे दोघे वेगळे झाले. अक्षयबरोबर जवळपास सात चित्रपट करणारे दिग्दर्शक सुनील दर्शन यांनी आता शिल्पा शेट्टी व अक्षय कुमारच्या नात्याबद्दल भाष्य केलं आहे. शिल्पा व अक्षय लग्न करणार होते, पण शिल्पाच्या आई- वडिलांनी काही अटी ठेवल्या होत्या. त्या मान्य न झाल्याने या दोघांचं ब्रेकअप झालं असा दावा सुनील दर्शन यांनी केला.

अक्षय व शिल्पा एकत्र खूप छान दिसायचे, पण नियतीने मात्र दोघांची वेगळंच काहीतरी ठरवलं होतं, असं सुनील म्हणाले. ट्विंकल खन्नाचे वडील राजेश खन्ना यांच्या जवळच्या एका ज्योतिषाने अक्षय आणि ट्विंकलचे लग्न होईल असं भाकीत केलं होते पण त्यावेळी आपण ते गांभीर्याने घेतलं नव्हतं, असं सुनील यांनी सांगितलं. त्या वेळी ट्विंकल व अक्षयचा एकमेकांशी काहीही संबंध नव्हता. पण योगायोग पाहा, जर शिल्पाच्या पालकांनी त्या अटी ठेवल्या नसत्या तर त्यांच्या आयुष्याने वेगळे वळण घेतले असते, असं सुनील दर्शन म्हणाले. शिल्पा शेट्टीच्या आई- वडिलांनी ठेवलेल्या अटींबद्दल विचारलं असता सुनील म्हणाले, आई- वडील म्हणून त्यांनी त्यांच्या मुलीच्या सुरक्षित भविष्यासाठी ज्या गोष्टी हव्या असतात, त्यात काहीच चुकीचं नसतं. आर्थिक सुरक्षेबद्दल बोलत आहात का असे विचारल्यावर सुनील म्हणाले, सर्व प्रकारची सुरक्षा. कारण सर्व आई- वडिलांची मुलींसाठी ती अपेक्षा असतेच. पण शिल्पाच्या आई-वडिलांनी ठेवलेल्या अटी बरोबर नव्हत्या, असं सुनील यांना वाटतं. मला वाटलेलं की शिल्पाच्या आई-वडिलांचं हे चुकतंय, पण ते लग्न त्यांच्या नशिबातच नव्हतं, असंच त्याकडे पाहायला हवं, असं त्यांनी सांगितलं. 'एक रिश्ता'च्या शूटिंगच्या काही काळापूर्वीच शिल्पा शेट्टी व अक्षय कुमारचं ब्रेकअप झालं. सुनील दर्शन म्हणाले, अक्षय फार दु:खी नव्हता. तो बरा होता. तो सावरत होता. शिल्पाबरोबर ब्रेकअप झाल्यावर अक्षयने स्वत:ला कामात गुंतवून घेतलं होतं. तो 'एक रिश्ता'बरोबर 'धडकन' आणि 'हेरा फेरी' मध्ये काम करत होता. अक्षय कुमारच्या आयुष्यात फक्त शिल्पा शेट्टीच नाही तर रवीना टंडनही होती. रवीना टंडनबरोबर अक्षयचा साखरपुडा झाला होता. पण लग्न होऊ शकलं नाही. अक्षय कुमारने २००१ साली राजेश खन्ना व डिंपल कपाडियांची मुलगी ट्विंकल खन्ना हिच्याशी लग्न केलं. त्यांना एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये आहेत. तर दुसरीकडे शिल्पा शेट्टीने २००९ मध्ये राज कुंद्राशी लग्न केलं. त्यांनाही दोन अपत्ये आहेत.



# 'रंगीला'चा रिमेक येणार?

अभिनेत्री उर्मिला मातोंडकर बऱ्याच काळापासून स्क्रीनवर दिसलेली नाही. एकेकाळची ती आघाडीची अभिनेत्री होती. 'रंगीला' हा उर्मिलाच्या करिअरमधला सुपरहिट सिनेमा होता. आमिर खानसोबत तिची जोडी झळकली होती. आजही सिनेमातील तिच्या अभिनयाचं आणि डान्सचं कौतुक होतं. दरम्यान अनेकदा 'रंगीला'च्या सीक्वेलची चर्चा होते. उर्मिलाने नुकतीच यावर प्रतिक्रिया दिली. उर्मिला मातोंडकर म्हणाली, हा सिनेमा रिलीज झाला आणि काळ जणू काय थांबलाच होता. असे खूप कमी सिनेमे असतात जे लोकांच्या मनात वेगळं स्थान निर्माण करतात. आजही एअरपोर्टवर किंवा इतर कुठेही लोक मला मिली नावाने हाक मारतात. माझ्या भूमिकेचं हे नाव आजही सगळ्यांच्या लक्षात आहे हे खरोखरंच कमाल आहे. सिनेमाच्या रीमेकविषयी विचारताच उर्मिला म्हणाली, ज्याची त्याची मर्जी आहे. जर कोणाला वाटत असेल की त्यांनी रिमेक करावा. मी काय बोलू? सिनेमा कधीच कोणा एकाचा नसतो. एकदा सिनेमा रिलीज झाला की तो तुमचा राहत नाही. या काही वर्षात मला एक समजलं की जो सिनेमा मी केला तो ज्याने पाहिला त्या प्रत्येकाचा आहे. मी ती भूमिका केली आणि सिनेमा स्क्रीनवर आला तेव्हाच स्क्रीनवर दिसत असलेल्या त्या मुलीपासून मी वेगळी झाले. त्यामुळेच आपल्या जुन्या भूमिकांबद्दल पजेसिव्ह असणं किंवा त्यावर अधिकार गाजवणं जरा बालिश आणि वेडेपणाचं वाटतं. जर कोणाला रिमेक करायचा असेल तर त्यांनी तो करावा, का नाही? जितके जास्त लोक करतील तितकी मजा येईल. सिनेमा कसा बनेल हे प्रेक्षक ठरवतील. माझ्याकडून तर नेहमीच हे स्वागतार्ह आहे. 'रंगीला' थिएटर्समध्ये पुन्हा रिलीज झाला आहे. सिनेमात आमिर खान, उर्मिला मातोंडकर आणि जॅकी श्रॉफची भूमिका आहे. सिनेमातील गाणी, आमिरचे डायलॉग आणि स्टाईल, उर्मिलाचं सौंदर्य आणि अभिनय, जॅकी-उर्मिलाची केमिस्ट्री या सगळ्याच गोष्टींमुळे सिनेमा तुफान गाजला.





# राजकारणात येणं हा माझा हेतू नाही

बॉलिवूडची धकधक गर्ल म्हणून ओळखली जाणारी अभिनेत्री माधुरी दीक्षित लाखो चाहत्यांच्या मनावर आजही अधिराज्य गाजवतेय. माधुरी दीक्षित एक उत्तम अभिनेत्री असण्याोबतच ती एक उत्कृष्ट नृत्यांगना देखील आहे. माधुरीबरोबर काम करणं हे त्या काळातील आघाडीच्या अभिनेत्यांचं स्वप्न असायचं. सध्या माधुरी तिचा आगामी चित्रपट मिसेस देशपांडेमुळे चर्चेत आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून ती ओटीटी विश्वात पाऊल ठेवते आहे.

दरम्यान, गेल्या काही काळापासून माधुरी राजकारणात प्रवेश करणार अशी कुजबुज सुरू होती. 'मिसेस देशपांडे' या चित्रपटाच्या निमित्ताने दिलेल्या एका मुलाखतीत तिने यावर स्पष्ट शब्दांत आपली प्रतिक्रिया दिली आहे. मागील काही वर्षांपासून माधुरी राजकारणात प्रवेश करणार अशा चर्चा जोर धरू लागल्या होत्या इतकंच नाही २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत माधुरी निवडणुक लढवणार असंही म्हटलं जात होतं. या सर्व चर्चांना पूर्णविराम देत अभिनेत्रीने तिचं मत व्यक्त केलं आहे. अलिकडेच एका मुलाखतीत राजकीय क्षेत्रात एन्ट्री घेणार असल्याचं अफवांचं खंडण केलं. अभिनेत्री म्हणाली, मी आता काहीच सांगू शकत नाही. पण,मला वाटतं राजकारण हे माझं काम नाही. मी एक कलाकार आहे आणि कलाक्षेत्रातील काही बदल असतील त्यासाठी मी कायम प्रयत्नशील असेन. किंवा या क्षेत्रातील विविध गोष्टींबद्दल जनजागृती करण्याचं काम करेन. सध्या तरी मी स्वत: ला या भूमिकेत पाहते. असं स्पष्ट मत अभिनेत्रीने व्यक्त केल. पुढे अभिनेत्री म्हणाली, राजकारणात येणं हा माझा हेतू नाही. शिवाय एक कलाकार म्हणून जे काही मला करायचं आहे ते मी करु शकते. मी माझ्या या विश्वातच बरी आहे. राजकारणापेक्षा मला ते जास्त महत्त्वाचं वाटतं. असंही माधुरीने सांगितलं.

# 'देसी गर्ल' करणार साउथ सिनेसृष्टीतून कमबॅक

'देसी गर्ल'प्रियंका चोप्रा काही वर्षांपूर्वीच परदेशात स्थायिक झाली. सध्या प्रियंका पती निक जोनास आणि लेक मालतीसह अमेरिकेत राहते. मध्येच ती काही कमिटमेंट पूर्ण करण्यासाठी भारतात येते. प्रियंका २०१९ साली 'द स्काय इज पिंक' या हिंदी सिनेमात दिसली. नंतर अजून तिने एकही हिंदी सिनेमा केलेला नाही. दरम्यान प्रियंका सध्या हैदराबादमध्ये असून ती दाक्षिणात्य सिनेमातून कमबॅक करत आहे. हॉलिवूडमध्ये स्थिरावलेली प्रियंका चोप्रा आता साउथमध्ये झळकणार आहे. एस एस राजमौली यांच्या SSMB29 या सिनेमात ती मुख्य भूमिकेत आहे. सिनेमात प्रियंका पहिल्यांदाच सुपरस्टार महेश बाबूसोबत झळकणार आहे. प्रियंकालाही भारतीय सिनेमात कमबॅक करायचंच होतं. पण यासाठी तिने हिंदी नाही तर साउथ निवड केली आहे.

SSMB29 या सिनेमासाठी प्रियंका अनेकदा भारतात येत असते. १५ नोव्हेंबरला सिनेमाचं टायटल आणि पहिली झलक समोर आली आहे. हैदराबादमधील रामोजी फिल्म सिटीमध्ये मोठ्या इव्हेंटचं आयोजन करण्यात येणार आहे. प्रियंकाला या सिनेमात पाहण्यासाठी तिचे चाहते उत्सुक आहेत. दरम्यान प्रियंका 'लव्ह अँड वॉर'मध्येही दिसणार असल्याची चर्चा आहे. संजय लीला भन्साळींनी तिला एका डान्सनंबरसाठी अप्रोच केलं आहे.